**<u>सह दिवाणी न्यायालय परंडा यांचे न्यायालयात</u>**

**नि.दि.दावा क्र. २४३/२०१३.** **निशाणी क्र.११७**

**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. ०३ ची जबानी</u>**

<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की</u>,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | श्री. विलास दत्तु देवकर, |
| वय | – | ५२ वर्षे, |
| व्यवसाय | – | वकीली, |
| राहणार | – | कुर्डुवाडी रोड, शिक्षक सोसायटी परंडा, ता. परंडा, जिल्हा उस्मानाबाद. |

**<u>वादी तर्फे वकील श्री.आय.डी.शेख साहेब यांचे मार्फत</u> –**

नियमीत दिवाणी दावा क्र. २४३/२०१३ मधुकर वि. ज्ञानदेव मध्ये मला कोर्ट कमिशनर म्हणुन अर्ज निशाणी क्र. ३७ वरील आदेशानुसार नियुक्त केले होते. मला कमिशन पत्र मिळाले होते. रिसीव्हड म्हणुन कमिशनपत्रावर माझी सही आहे. तो गोषवारा निशाणी क्र. ४१ आहे. कमिशनपत्र मिळाल्यानंतर वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांची चौकशी करुन मी मोक्का पाहण्याची तारीख निश्चित केली. तारीख १७.०९.२०१४ ही निश्चित केली. त्याप्रमाणे वादी व प्रतिवादीचे वकीलांना नोटीसा दिल्या व निश्चीत तारखेला मोक्का ठिकाण भोत्रा येथील सर्वे क्र. ९०/ड व गट क्र. ९०/इ या ठिकाणी ठिक सकाळी ११.०० वाजता पोहोचलो. त्याठिकाणी गेल्यानंतर वादीचे वकील आणि वादी व इतर लोक तिथे हजर होते. त्याठिकाणी प्रतिवादी व प्रतिवादीचे वकील हजर नव्हते. त्यानंतर प्रतिवादीच्या वकीलांना फोन केला व त्यांची बराच वेळ वाट बघितली, तरीदेखील ते हजर झाले नाहीत. त्यानंतर कमिशन कामाला सुरुवात केली. हजर असलेल्या लोकांना वादी व इतर पंच यांना

कमिशनपत्र वाचुन दाखविले व त्याप्रमाणे पाहणी केली. पंच भारत संभाजी लोंढ व लालासाहेब भिमराव देशमुख दोघे ही रा. भोत्रा येथील होते. कमिशन पूर्ण केल्यानंतर वेगळा पंचनामा केला, तो पंचनामा वादी व पंचांना वाचुन दाखविला. त्यावर वादी, वादीचे वकील व पंचांच्या सहया घेतल्या व कोर्ट कमिशनर म्हणुन मी सही केली. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी तसेच पंचांच्या सहया आहेत, वादीची सुध्दा सही आहे. पंचनाम्यातील मजकुर माझ्या हस्ताक्षरात आहे, तो खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास **निशाणी क्र. ११८** देण्यात येते. त्यानंतर मी माझा अहवाल दिनांक २०.०९.२०१४ रोजी न्यायालयात दाखल केला. आता मला रिपोर्ट निशाणी क्र. ५५/१ दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर बरोबर आहे. रिपोर्ट दाखल केल्यानंतर प्रतिवादीच्या वकीलांनी हरकत घेतली. प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी निशाणी क्र. ५८ अर्ज दिला व पुन्हा पाहणी करण्याची विनंती केली. त्या अर्जावर आदेश करण्यात येवुन दिनांक २१.१२.२०१४ रोजी वादी, प्रतिवादी व त्यांच्या वकीलांनी मोक्यावर हजर राहावे असे आदेशित केले. त्यानुसार मी मोक्क्यावर गेलो. मोक्क्यावर वादी तसेच प्रतिवादी क्र. ७ व ८ तसेच त्यांचे वकील हजर होते, तसेच इतर लोक हजर होते. त्यापैकी दोन लोकांना पंच म्हणुन घेतले. वादी तर्फे पंच म्हणुन लालासाहेब भिमराव देशमुख व प्रतिवादी तर्फे पंच म्हणुन चंद्रकांत सुबराव गोफणे होते. त्यानंतर वादी, प्रतिवादी यांच्याकडुन मोक्क्याचे ठिकाण निश्चित करुन घेतले व त्यानंतर वादी, प्रतिवादी व पंच यांना कमिशनपत्र वाचुन दाखविले व प्रत्यक्ष कमिशनचे काम पूर्ण केले. तसा पंचनामा केला. पंचनाम्यावर वादी, वादीचे वकील, प्रतिवादी क्र. ७ व ८ व कमिशनर म्हणुन माझी सही आहे. तसेच प्रतिवादी क्र. ७ व ९ यांचे वकीलांची सही आहे. आता मला पंचनामा दाखविण्यात आला, तो तोच आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी तसेच वादी, प्रतिवादी व त्यांचे वकीलांच्या सहया आहेत. पंचनाम्यास **निशाणी**

**क्र. ११९** देण्यात येते. आता मला माझा रिपोर्ट निशाणी क्र. ६२ दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर बरोबर आहे. निशाणी क्र. ६२ सोबत असलेला नकाशा मी पाहणीनुसार तयार केलेला आहे, तो निशाणी क्र. ६२ चा भाग आहे.

**उलटतपास प्रतिवादी क्र. ३ ते ६ तर्फे विधीज्ञ एस.आर.काळे यांचे तर्फे–**

मोक्क्यावर गेल्यानंतर वादी व इतर लोकांनी जमीन व तिचा सर्वे क्रमांक सांगितला व ती तिच जमीन आहे असे सांगितले. मी सर्वे क्र. ९०/१/इ तसेच ९०/१/ड ची पाहणी केली. पाहणी करताना मला वादींनी तसेच तिथे असलेल्या पंचांनी जमीनीचा टोच नकाशा दाखविला नाही. पहिल्यांदा मी पाहणीसाठी गेलो तेव्हा मोक्क्याचा नकाशा काढला नव्हता. मी दुस–यांदा नकाशा काढला. मी केलेल्या कार्यवाहीची पंचनामा, अहवाल, नकाशाची प्रत माझ्याकडे ठेवलेली आहे.

मी नकाशा मध्ये सर्वे क्र. ९०/१/इ च्या चर्तुसिमा पूर्वेस वस्ती, पश्चिमेस बांध आणि पांद, दक्षिणेस सिना नदी व उत्तरेस भिमराव जगताप यांची जमीन अशा आहे. मी भिमराव जगताप नावाच्या व्यक्तीस वैयक्तीक ओळखत नाही. सर्वे क्र. ९०/१/इ च्या चर्तुसिमा पंच तसेच वादी व प्रतिवादी यांनी सांगितल्या. दक्षिणेला पांद असल्याबद्दल मी प्रत्यक्ष पाहुण खात्री केली. सर्वे क्र. ९०/१ चे किती भाग आहेत याबद्दल मी विचारणा केली नाही. मी सर्वे क्र. ९०/१/ड व ९०/१/इ चे मोजमाप केले नाही व क्षेत्रफळाबद्दल चौकशी केली नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, कमिशनपत्रामध्ये मोजमाप करण्याचे आदेशित केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. ९०/१/ड व ९०/१/इ चे मोजमाप चे मोजमाप केल्याशिवाय ते कुठुन सुरु होतात व कोठे संपतात हे मला सांगता येत नाही.

प्रश्न – नकाशामध्ये सर्वे क्र. ९०/१/इ चे पश्चिमेस दर्शविलेला पांद म्हणुन भाग हा सर्वे क्र. ९०/१/ड चा भाग आहे किंवा सर्वे क्र. ९०/१/इ चा भाग आहे हे

तुम्हाला सांगता येत नाही ?

उत्तर – मला सांगता येते. कारण सर्वे क्र. ९०/१/इ च्या पश्चिमेला व बांधाच्या पश्चिमेला पांद होता.

सर्वे क्र. ९०/१/इ ची पूर्व–पश्चिम रुंदी किती होती हे मला सांगता येत नाही. सर्वे क्र. ९०/१/ड ची पूर्व–पश्चिम रुंदी किती होती हे मला सांगता येत नाही. कारण तो कमिशनचा भाग नव्हता. कमिशनच्या वेळेस वादी, प्रतिवादींनी पांद संदर्भातील कागदोपत्री पुरावा व अधिकृत नकाशा मला दाखविला नाही.

हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी चुकीची पाहणी केली, चुकीचा नकाशा तयार केला, चुकीचा अहवाल सादर केला व चुकीची साक्ष दिली.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. ७ व ८ तर्फे विधीज्ञ एन.एस.माढेकर यांचे तर्फे–</u>**

माझ्याकडे कमिशनसाठी कमिशनपत्र आले होते व कमिशनच्या अर्जाची प्रत सुध्दा आली होती. मी कमिशनला जाण्यापूर्वी अर्ज वाचला होता. अर्ज निशाणी क्र. ३७ मध्ये कलम १ मध्ये सर्वे क्र. ९०/१/इ च्या चर्तुसिमा पूर्वेस सुग्रीव रामराव गोफणे, पश्चिमेस दहा फुट रुंदी पाणंद व त्यानंतर भिमराव बाबुराव जगताप व सहदेव बाबुराव जगताप यांची जमीन, दक्षिणेस सिना नदी व उत्तरेस भारत नारायण बुरंगे यांची जमीन अशा दर्शविलेल्या आहेत. पाहिल्यांदा जावुन पाहणी व पंचनामा करुन आल्यानंतर न्यायालयाने मला पुन्हा पाहणीसाठी जाण्यास सांगितले.

कमिशन पाहणीचे अ ते इ हे पॉईंट होते. सर्वे क्र. ९०/१ चे किती भाग आहेत याची खात्री मी केली नाही. सर्वे क्र. ९०/१/अ ते ९०/१/इ चे पोटहिस्से किती व कसे आहे याची खात्री मी केली नाही. सर्वे क्र. ९०/१/इ चे क्षेत्र ०२ हे १० आर चे लांबी रुंदी काय होती हे मला सांगता येत नाही. तसेच सर्वे क्र. ९०/१/ड ची लांबी रुंदी मला सांगता येत नाही. मुद्दा क्र. अ मध्ये सर्वे क्र. ९०/१/इ क्षेत्र् ०२ हे १० आर तसेच सर्वे क्र. ९०/१/ड क्षेत्र ०२ हे १० आर यांच्यामध्ये पांद किंवा जाण्या

येण्याचा रस्ता आहे किंवा नाही आणि तो असल्यास त्याची रुंदी किती फुट आहे हे पाहायचे होते. मुद्दयानुसार दिनांक २१.१२.२०१४ रोजी मी स्थळ पाहणी केली. त्यावेळे वादी, प्रतिवादी व त्यांचे वकील तसेच इतर लोक हजर होते. मी पाहणी करुन पंचनामा केला. तेव्हा प्रतिवादी क्र. १ ज्ञानदेव सुर्यभान गोफणे यांनी ज्या जमीनीची मी पाहणी केली ती जमीन सर्वे क्र. ९०/१/ड तसेच सर्वे क्र. ९०/१/इ हे नाही असे सांगितले होते व तसे पंचनाम्यात नमुद केलेले आहे. मी पाहणी करुन माझा अहवाल निशाणी क्र. ६२ प्रकरणात दाखल केला.

अर्ज निशाणी क्र. ३७ मध्ये मुद्दा ड सदर पांदीच्या पूर्व बाजुस बांधापर्यंत वादीच्या मालकीची तुरीचे पिक आहे किंवा नाही असा होता. सर्वे क्र. ९०/१/इ म्हणुन ज्या जमीनीची मी पाहणी केली त्या जमीनीमध्ये तुरीचे पिक दिसुन आले नाही तर वादीचे ऊसाचे पिक दिसुन आले व पांदीच्या पश्चिमेकडील बाजुस प्रतिवादी भिमराव बाबुराव जगताप यांचे ज्वारीचे पिक दिसुन आले. नकाशामध्ये दाखविलेल्या सर्वे क्र. ९०/१/इ या भागामध्ये मधुकर गोफणे यांचे ज्वारीचे पिक दिसुन आले असे दिर्शविलेले आहे. ऊसासोबत वादीचे मालकीचे ज्वारीचे पिक दिसुन आले असे अहवालात नमुद केलेले नाही.

नकाशामध्ये सर्वे क्र. ९०/१/इ च्या उत्तरेकडे बंद केलेला रस्ता आणि भिमराव जगताप यांची जमीन असे दर्शविलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मोक्क्यावर सर्वे क्र. ९०/१/इ मध्ये जावुन पाहणी केली व नकाशा तयार केला हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मी जमीनी संदर्भात आक्षेप असताना सुध्दा वादीच्या सांगण्यावरुन खोटा अहवाल तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, भिमराव जगताप यांची जमीन सर्वे क्र. ९०/१/ड हा वादीच्या पश्चिमेकडील बाजुस असताना नकाशामध्ये दिशाभूल करण्यासाठी उत्तर बाजुस दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, कमिशनचे काम मी वादीच्या सांगण्यावरुन केले. हे म्हणणे खारे नाही की, प्रतिवादीचा

कुठलाही आक्षेप मी विचारात घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे क्र. ९०/१/इ व सर्वे क्र. ९०/१/ड ची स्थळ निश्चिती न करता मी चुकीची पाहणी केली व चुकीचा अहवाल दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्वे क्र. ९०/१/ड व सर्वे क्र. ९०/१/इ ची पाहणी केल्याचे खोटे सांगत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.02.16 17:29:26 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–१६.०२.२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, परंडा